**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशाचे ५३वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी घेतली शपथ.**
2. **सहावी आंतरराष्ट्रीय कृषीशास्त्र काँग्रेस आजपासून नवी दिल्ली इथं सुरू.**
3. **प्रसिद्ध अभिनेता धर्मेंद्र यांचं निधन; मुंबईत अंत्यसंस्कार.**
4. **विदर्भातील सर्व जिल्ह्यांत किमान तापमानात वाढ.**

-------------------------------------------

नवे सरन्यायाधीश

देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून आज न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ देववली. न्यायमूर्ती सूर्यकांत ९ फेब्रुवारी २०२७ ला निवृत्त होतील. सूर्यकांत यांनी वकील म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली होती. पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयात त्यांनी न्यायदानाची जबाबदारी सांभाळली होती, तसंच ते काही काळ हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून कार्यरत होते. कलम ३७० रद्द करणं, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकत्व हक्कांवरील प्रकरणं, बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणासंदर्भातील प्रकरणाच्या सुनावणीत त्यांचा सहभाग होता. बार असोसिएशन मधील एक तृतीयांश जागा महिलांसाठी आरक्षित करण्यातही त्यांनी योगदान दिलं होतं.

-------------------------------------------

कृषी शास्त्र काँग्रेस

सहावी आंतरराष्ट्रीय कृषीशास्त्र काँग्रेस आजपासून नवी दिल्ली इथं सुरू झाली. कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन झालं. तीन दिवसांच्या या कार्यक्रमात चर्चासत्रं, व्याख्यान, युवा शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी परिषद तसंच प्रदर्शनाचा समावेश आहे. या कार्यक्रमात जगभरातून प्रतिनिधींसह कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, आयसी एआरचे उपमहासंचालक, उद्योग प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचे तज्ज्ञ आदी एक हजाराहून अधिक लोक उपस्थित राहण्याची

अपेक्षा आहे. 'स्मार्ट कृषी-अन्न प्रणाली आणि पर्यावरण संरक्षणासाठी कृषीशास्त्राची पुनर्कल्पना' अशी या परिषदेची संकल्पना आहे.

-------------------------------------------

धर्मेंद्र

सुप्रसिद्ध अभिनेता धर्मेंद्र यांचं आज निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वी त्यांना प्रकृतीअस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आलं होतं. मात्र आज त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर मुंबईत पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या कुटुंबियांसह निकटवर्तीय उपस्थित होते.ऐकूया धर्मेंद्र यांच्या सिने कारकिर्दीवर आधारित हा **विशेष रिपोर्ट -**

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***डायलॉग.... भारतीय सिने विश्वात धर्मेंद्र हि मॅन म्हणून प्रसिद्ध होते. ६५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ३०० हून जास्त चित्रपटांमधे भूमिका साकारणारे धर्मेंद्र यांनी १९६० मधे 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. (पल पल दिल के पास) देखणं रुबाबदार व्यक्तिमत्व आणि संवेदनशील चेहरा या वैशिष्ट्यांच्या बळावर धर्मेंद्र यांनी कविमनाच्या रोमँटिक नायकाच्या भूमिका साकारल्या, तसंच ॲक्शन हिरोच्या भूमिकांमुळे ते हिंदी चित्रपटसृष्टीचे 'ही मॅन' म्हणून प्रसिद्ध झाले. (डायलॉग)***

***बंदिनी, हकिकत, शोले, गुड्डी, सीता और गीता, लोफर, यादों की बारात, चुपके चुपके, शोले, चाचा भतीजा, द बर्निंग ट्रेन, इन्साफ का तराजू, राम बलराम अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमधे त्यांनी भूमिका साकारल्या होत्या. आगामी इक्कीस या चित्रपटातही त्यांची भूमिका आहे. काही बंगाली आणि पंजाबी चित्रपटातही त्यांनी काम केलं होतं. बॉलिवुडमधल्या कामगिरीबद्दल त्यांना फिल्मफेअरचा जीवन गौरव पुरस्कार मिळाला होता. २००४ ते २००९ या काळात त्यांनी लोकसभेत बिकानेर मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं. त्यांना पद्मभूषण सन्मानानं गौरवण्यात आलं होतं. (साथिया नाही जाणा)***

***अतिशय लोकप्रिय अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनानं भारतीय चित्रपटसृष्टीचं मोठं नुकसान झालं आहे. कलाकारांच्या अनेक पिढ्यांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली होती, घेत राहतील, या शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली अर्पण केली. धर्मेंद्र यांच्या निधनामुळे हिंदी चित्रपटसृष्टीतल्या एका महान पर्वाचा अंत झाल्याची शोकभावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. (गीत)***

*भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. तर १९६०च्या दशकात भारतीय सिनेसृष्टीत पदार्पण करून भारतीय प्रेक्षकांची मन जिंकणाऱ्या सिनेसृष्टीच्या धरम पाजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. आज धर्मेंद्र काळाच्या पडद्याआड गेले असले तरी त्यांच्या भूमिकांतून, गीतांतून आणि डायलॉग मधून ते रसिक श्रोत्यांच्या मनात कायम जिवंत राहतील. (आकाशवाणीसाठी मी नम्रता फलके)*

---------------------------------------------

किरेन रिजिजू

अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांच्या नेतृत्वाखाली भारताचं एक शिष्टमंडळ भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष परत आणण्यासाठी भूतानला पोहोचलं आहे. हे अवशेष भूताननं आयोजित केलेल्या जागतिक शांती प्रार्थना महोत्सवासाठी विशेष सन्मान म्हणून पाठवण्यात आले होते. हे अवशेष भूतानच्या ताशिचोदझोंगच्या ग्रँड कुएनरे हॉलमध्ये ठेवण्यात आले होते.

---------------------------------------------

गुरू तेग बहादूर

शिखांचे नववे गुरू, गुरू तेग बहादुर यांचा साडेतीनशे वा हुतात्मा दिन आज पाळला जात आहे. गुरू नानक देव यांच्या शिकवणीच्या प्रसारासाठी गुरू तेग बहादुर यांनी देशभर प्रवास केला होता.

---------------------------------------------

युनिटी मार्च

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त भारत सरकारच्या युवा कल्याण मंत्रालयद्वारा देशभरातून चार युनिटी मार्चचं आयोजन करण्यात आलं आहे. या चार मार्चमधून एक युनिटी मार्च नागपूर शहर ते गुजरातच्या आनंदनगरपर्यंत जाणार असून या मार्चला भारतीय बॅडमिंटनपटू मालविका हिच्या हस्ते झेंडा दाखवून रवाना करण्यात आलं. देशभरात एकता आणि अखंडतेचा संदेश देण्यासाठी या रॅलींचं आयोजन करण्यात येत आहे. याबाबत भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे यांनी अधिक माहिती दिली -

*(होल्ड बाईट - भेंडे - ३० सेकंद)*

*नागपूरला ही रॅली आली होती. या रॅलीसोबत 400 युवक हे नागपुर पासून ते गुजरात,केवळीया पर्यंत राहणार आहेत आणि नागपुरात मोठ्या प्रमाणात स्वागत झालं नागपुरात आणखी २४ ठिकाणी याच भव्य ठिकाणी स्वागत होणार आहे नागपूरचे 100 बुलेटधारी युवक या रॅली सोबत राहणार आहेत आणि एकंदरीत देशामध्ये एकतेचा आणि अखंडतेचा संदेश जावा जी सरदार वल्लभभाई पटेल यांची मनापासून योजना होती मनापासून त्यांचा विचार होता त्या विचारला प्रोत्साहित करून देशातल्या युवकांनी यात सामील व्हावं अशाप्रकारची कल्पना घेऊन या रॅलीचे आयोजन करण्यात आलं.*

-------------------------------------------

नागपूर पुस्तक महोत्सव

एनबीटी अर्थात राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाउंडेशन यांच्या सहयोगानं आयोजित पहिल्या 'नागपूर पुस्तक महोत्सवा'चा आज तिसरा दिवस आहे. पुस्तक प्रदर्शनासोबत अनेक साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजनही करण्यात आलं आहे. या महोत्सवात तरुणांची संख्या लक्षणीय असल्याचं प्रतिपादन राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद मराठे यांनी आकाशवाणीशी बोलताना केलं -

*(होल्ड बाईट - मराठे - २५ सेकंद)*

*मी आज नागपुर पुस्तक महोत्सवाच्या रेशीमबाग पटांगणामध्ये उभा आहे आणि पटांगण नागरिकांनी तुडुंब भरत आहे आणि विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे गर्दीमध्ये अनेक तरुण आहेत पन्नास टक्के तरुण आज तिथे येत आहेत. माझा आपल्या सगळ्यांचा असं विनंती आहे की 22 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबर पर्यंत आपण सर्वांनी नागपुर पुस्तक महोत्सवामध्ये यावं.*

दरम्यान, पुस्तक महोत्सवात आज सायंकाळी प्रसिद्ध गायक भीमराव पांचाळे यांच्या गझल गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

-------------------------------------------

इफ्फी

गोव्यात सुरू असलेल्या ५६ व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज बालपणाच्या विविध छटा आणि संघर्षाविषयीचे विविध चित्रपट दाखवण्यासाठी युनिसेफ अर्थात संयुक्त राष्ट्र बालनिधीबरोबर भागीदारी केली आहे. मुलांचे प्रश्न, आव्हानं आणि संधी यांची मांडणी करण्यासाठी इफ्फीत पाच चित्रपट दाखवले जात आहेत. हे सर्व चित्रपट भारत, कोसोवो, इजिप्त, दक्षिण कोरिया अशा

विविध देशांचे असून यांमुळे प्रेक्षकांना सांस्कृतिक सीमा ओलांडून लहान मुलांचं जग अनुभवता येईल, असं मनोगत युनिसेफच्या भारतातल्या प्रतिनिधी सिंथिया मॅकॅफ्रे यांनी व्यक्त केलं. त्याशिवाय इफ्फी महोत्सवात आज एआय हॅकेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. इफ्फीच्या इतिहासात प्रथमच अशा उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून, चित्रपट क्षेत्रातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ एकत्र येऊन नावीन्यपूर्ण एआय-आधारित प्रणाली तयार करणार आहेत. दरम्यान वेव्हज फिल्म बाजार सध्या चित्रपट निर्माते आणि कलाकारांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहे.

-------------------------------------------

क्रिकेट

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुवाहाटी इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवसअखेर लक्ष्याचा पाठलाग करत भारताचा संपूर्ण संघ २०१ धावांवर बाद झाला. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा संघ ३१४ धावांनी आघाडीवर आहे. दिवसाअखेर दक्षिण आफ्रिका संघ फलंदाजी करत असून त्यांच्या ८ षटकांत २६ धावा झाल्या आहेत.

-------------------------------------------

हॉकी

मलेशियामध्ये सुरू असलेल्या सुलतान अझलान शाह चषक २०२५ स्पर्धेत काल सलामीच्या सामन्यात भारताच्या संघानं कोरियावर १-० अशा विजय मिळवला. मोहम्मद राहीलनं खेळातला एकमेव गोल केला. भारतीय संघाचा सामना आज बेल्जियमच्या संघाशी दुपारी साडेतीन वाजता ठरलेला होता. मात्र पावसामुळे सामना रात्री ८ वाजून ४५ मिनिटांनी खेळवला जाईल.

-------------------------------------------

हवामान

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात वाढ होत असून 14 ते 17 अंश सेल्सिअस दरम्यान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. भंडारा इथं आज 14 पूर्णांक सहा दशांश अंश सेल्सिअस, तर नागपूरमध्ये 16 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस इतकं सर्वाधिक किमान तापमान नोंदविण्यात आलं. कमाल तापमानात देखील किंचितशी वाढ दिसून येत आहे. सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं 33 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

-------------------------------------------